प्रेसनोट

दि. १९/०७/२०१८

## २४ तासात खूनातील आरोपीस घातल्या बेडया ! पुणे लोहमार्ग पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी

दिनांक १३/०७/२०१८ रोजी किरकोळ वादातून एका इसमाच्या डोक्यामध्ये दगड घालून त्यास गंभीर जखमी करून त्याचेवर कापड घालून अज्ञात आरोपी पळून गेला होता. सदर घटनेबाबत पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु.र.नं. ७७५/२०१८ कलम ३०२, ३०७, ५०६ (१) २ भा.दं.वि. प्रमाणे अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून तात्काळ घटनास्थळास पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मनोज बी. खंडाळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग पुणे उप विभागाचे श्री घोरपडे साहेब यांनी भेट दिली. पुणे लोहमार्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री तुषार पाटील यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून सदर गुन्हयाचा जलद तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे पोलीसांनी शिवाजीनगर रेल्वे स्टेशन व बस स्टॅड परीसर येथील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे बारकाईने निरीक्षण केले परंतू सदर घटनेबात काहीएक उपयूक्त माहिती मिळाली नाही. त्यानंतर पोलीसांनी आपले गुप्त बातमीदार यांना गुन्हयाची थोडक्यात माहिती देवून आरोपीचा ठावठिकाणाबाबत माहिती देण्यास सांगीतले.

दिनांक १४/०७/२०१८ रोजी गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहिती प्रमाणे पुणे लोहमार्ग पोलीसांनी शिवाजीनगर बस स्थानक येथे सापळा लावून आरोपीस बेडया घातल्या. आरोपीकडे कसून तपास करता त्याने आपले नाव तानाजी बाबुराव पांढरे वय ५१ वर्षे धंदा बिगारीकाम राह. शिवाजीनगर रेल्वे स्टेशनजवळ, पुणे फिरस्ता मुळ पत्ता देवगाव रोड, मरिआई गेट पोलीस चौकीजवळ, आमराई, मुकबधीर शाळेजवळ, सोलापूर असे सांगीतले असून त्यांच्यात पैशांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून मयत इसम नामे बसवराज वय अंदाजे ३१ वर्षे ( पुर्ण नाव  पत्ता माहिती नाही) याचे डोक्यात दगड घातला असल्याचे सांगून गुन्हयाची कबूली दिली. यातील मयत इसम नामे बसवराज वय अंदाजे ३१ वर्षे हे बेवारस असून त्याचे संपुर्ण नाव व पत्ता तसेच त्याचे नातेवाईक यांचेबाबत कोणास काही माहिती असल्यास पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेस कळवावे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मनोज बी. खंडाळे हे करित आहेत.

उपरोक्त उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस अधीक्षक पुणे लोहमार्ग तुषार पाटील, मा. उपविभागीय अधिकारी पुणे नंदकुमार घोरपडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज खंडाळे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक अमर कदम, पोलीस उप निरीक्षक अनिल पासगे, पोलीस हवालदार प्रशांत डोईफोडे, राजेंद्र भोसले, महिला पोलीस हवालदार सुनिता राठोड, .पो.शि. तनवीर मुलाणी, सचिन राठोड, संजिव हासे, सुदर्शण ईप्पर, प्रकाश राउत, चालक झगडे यांनी केली आहे.

----------०००० ----------

प्रति,

मा जनसंपर्क अधिकारी सो
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
यांना सविनय सादर

प्रतिवेदक . वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन,पुणे लोहमार्ग,पुणे

विषय :- बेवारस मयताचे नातेवाईकाचे शोध होणेकामी वर्तमानपत्र व दुरदर्शनवर प्रसिध्दी होणेबाबत

संदर्भ पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु र क्र ७७५/२०१८ कलम ३०२,३०७,५०६ भा द वि

२/उपरोक्त विषयान्वये सविवय सादर की,पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु र क्र ७७५/२०१८ कलम ३०२,३०७,५०६ मधील मधील अनोळखी मयत नामे बसवराज वय अंदजे ३१ वर्षे,(पुर्ण नाव व पत्ता महित नाही) याची दिनांक १३/०७/२०१८ रोजी ०१.०० वा सुमारास शिवाजीनगर रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म क्र १ मधील पंपहाउस समोरील बाकडयावर झोपला असताना आरोपी नामे तानाजी बाबूराव पाढरे वय ५१ वर्षे रा शिवाजीनगर, रा शिवाजीनगर,पुणे याने जुन्या भाडणाचा राग मनात धरून डोक्यात दगड मारून त्याला जखमी करून जीवे ठार मारले म्हणून वरील प्रमाणे गुन्हा नोद असून त्याचे एम.एल.पी.एम क्र 3553/18 अन्वये मयताचे पोस्टमार्टम झाले असून मयतास मरणाचे कारण HEAD INJURY असे देण्यात आले आहे.

**मयताचे वर्णन खालीलप्रमाणे**



| | |
|---|---|
| नाव | बसवराज पुर्ण नाव व पत्ता माहित नाही |
| वय | अंदाजे ३२ वर्षे |
| रंग | निमगोरा |
| उंची | ५ ६ |
| नाक | सरळ |
| अंगाने | सडपातळ |
| केस | काळे बारीक |
| दाढीमिशा | दाढी मिशा वाढलेली |

येणेप्रमाणे बेवारस मयत बॉडीचे नातेवाईकाचा शोध होणेकामी सर्व पोलीस स्टेशनला ब्रॉडकास्ट होणेस विनंती आहे.